**RESEARCH FRONT**

**ISSN**
(Print) 2320 – 6446, (Online) 2320-8341

# संवादपर्व : ध्येयासक्त मनाचे विचारपीठ

## (विशेष संदर्भ - ध्यासपर्व - पत्रात्मक अविष्कार)

**डॉ. शिवलिंग मेनकुदळे**
मराठी विभाग,
छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा.

***गोषवारा***

*मराठी साहित्याला पत्रात्मक वाङमयाची खूप मोठी परंपरा आहे. विशेषतः संत ज्ञानेश्वरांनी चांगदेवाला केलेला पत्रात्मक उपदेशापासून ते आजपर्यंत ही परंपरा सापडते. लोकहितवादींची शतपत्रे, बाळशास्त्री जांभेकरांची पत्रे, कवी अनिल आणि कुसुमावती देशपांडे यांच्यातील वाङमयीन अभिरूची वाढविणारा पत्रव्यवहार, जी.ए. कुलकर्णी यांचा साहित्य विषयक जाणिवा व्यक्त करणारी पत्रे, कर्मवीर भाऊराव पाटील यांची पत्रे आणि संवादपर्वच्या निमित्ताने आपणासमोर पाच खंड आलेले आहेत. अशी खूप मोठी परंपरा या पत्रवाङमयाला आहे. मात्र संशोधक आणि अभ्यासकांचे याकडे दुर्लक्ष झाले आहे. हा इतिहास संवादपर्वचे आशय आणि अभिव्यक्तीचे वेगळेपण मांडताना, अ‍ॅड. रावसाहेब शिंदे यांच्या वैचारिक, समाजाभिमुख व्यक्तिमत्वाचा तसेच महाराष्ट्रातील अनेक विचारवंताच्या वैचारिकतेचा प्रत्यय कसा येतो याची मांडणी केली आहे. 'ध्यासपर्व' हे आत्मचरित्र मराठी आत्मचरित्र वाङमयातील एक मानदंड ठरावा इतके मौलिक आहे. या आत्मचरित्राचे वैचारिक प्रतिबिंब संवादपर्वमध्ये कसे पडले, त्यासंदर्भातील काही प्रतिक्रिया नोंदविल्या आहेत, त्याचबरोबर संवादपर्वमध्ये आलेल्या पत्रांचे भाषिक विशेष स्पष्ट करताना ललित वाङमयाची मूल्ये म्हणून आपण ज्यांचा उल्लेख करतो ती रसात्मकता, भावनात्मकता, लालित्य, सौंदर्य यांचा अनुभव संवादपर्वमधील अनेक पत्रातून येतो. उपमा, अलंकार भाषेचा ओघवतीपणा प्रत्ययाला येतो. त्याचा आढावा घेतला आहे, तर शेवटी शोधनिबंधाचे निष्कर्ष मांडले आहेत.*

## प्रास्ताविक

मराठी वाङमयाचे अवलोकन केले तर असे लक्षात येते की, मराठी पत्रात्मक वाङमयाला खूप प्राचीन परंपरा आहे. पत्र वाङमय हा एका व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीला केलेला पूर्णतः खाजगी लेखन प्रकार आहे. ललित साहित्यासारखे ते सार्वजनिक किंवा सर्व स्तरातील वाचकांसाठी खुले असत नाही. असे असले तरीसुध्दा मराठी पत्र वाङमयाला संत ज्ञानेश्वरांपासूनची प्रदीर्घ परंपरा आहे. चांगदेवाने पाठविलेल्या कोऱ्या पत्राला उत्तर म्हणून त्याच पत्रावर पासष्ठ ओव्यांमध्ये केलेला उपदेश म्हणजे मराठी सारस्वताच्या मुकुटातील शिरोमणी आहे. हीच परंपरा आधुनिक काळातही जोपासलेली पाहावयास मिळते. खाजगी पत्र लेखनात ही बऱ्याच वेळा वाङमयीन लेखनाचे गुणविशेष दिसून येतात. पत्रलेखनाचा आत्माविष्कार, काव्यसौंदर्य पत्रलेखकाच्या जीवनातील व काळातील महत्त्वाच्या घटना, सांस्कृतिक विचारप्रवाह याचे प्रतिबिंब पाहावयास मिळते. तर तो सर्व वाचकांच्या दृष्टीनेही लक्षणीय ठरतो. अशा प्रकारचे पत्रलेखन संग्रहित केल्यास त्याचा समावेश पत्र वाङमयात होतो.

अव्वल इंग्रजी काळातील लोकहितवादींची शतपत्रे, जांभेकरांची काही पत्रे, बाबा पद्मनजी यांनी ज्ञानप्रकाशकर्त्यांना लिहिलेली पत्रे, पाश्चात्य कवींनी लिहिलेली पत्रे, वेगवेगळ्या कालखंडात वेगवेगळ्या देशात निर्माण झालेले पत्रवाङमय विविध स्वरूपात आहे. संत ज्ञानेश्वरांच्या चांगदेव उपदेशाप्रमाणेच मराठीतील

ऐतिहासिक पत्रव्यवहार अत्यंत विश्वसनीय स्वरूपाचा असल्याचे दिसून येते. तर ह.वि.माटे यांनी 'विश्वब्ध शारदा' या पत्रसंग्रहात इंग्रजी कालखंडातील पत्रव्यवहाराचे संकलन केले आहे. यामध्ये महाराष्ट्रीय समाज व साहित्य याविषयावरील विविध मान्यवरांची पत्रे समाविष्ट केली आहेत. तर दुसरा खंड मराठी रंगभूमी आणि महाराष्ट्रातील संगीत यासंबधीचा आहेत. कवी अनिल व कुसुमावती देशपांडे यांच्यातील पत्रव्यवहाराचे 'कुसुमानिल' (१९७२) हे संकलन वैशिष्ट्यपूर्ण आहे. "परस्परांविषयी ओढ, मानसिक ताण, एकमेकांचे वाचन, वाचलेल्या पुस्तकांच्या प्रतिक्रिया, काव्यावरचे प्रेम इत्यादी विषयावरील विवेचनही आढळते."(जोशी लक्ष्मण:१२२) जी.ए. कुलकर्णी यांच्या साहित्यविषयक जाणिवा व्यक्त करणारा जी-ए ची निवडक पत्रे खंड १, म.द. हातकण्ंगलेकर यांनी संपादित केला असून यामध्ये जी.ए. आणि सुनिताबाई यांच्यातील पत्रात्मक संवाद, त्यांच्या वैचारिक भावभावना व्यक्त झालेल्या आहेत. या ग्रंथाच्या प्रस्तावनेमध्ये ग.प्र. प्रधान यांनी पत्र वाङमयासंदर्भात समर्पक विश्लेषण केले आहे. "आपले मत, प्रतिक्रिया, विचार, आपला दृष्टिकोण व्यक्त करण्याचे प्रभावी व योग्य साधन पत्र हेच आहे. "(हातकणंगलेकर म.द. १९९५: ८)

स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर कालखंडात समाजाच्या विकासासाठी ज्यांनी सक्रिय योगदान दिले आहे. त्यांचे विचार व्यक्त करणारे पत्रात्मक वाङमय आज विपुल प्रमाणात उपलब्ध आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक, सामाजिक, राजकीय विचार व्यक्त करणारा पत्रसंग्रह 'कर्मवीरांची पत्रे' म्हणून उपलब्ध आहे. तथापि यापेक्षा अधिक पत्रे आजही समाजाच्या वेगवेगळ्या स्तरातून उपलब्ध होऊ शकतील, त्याचा शोध घेणे, त्याची चिकित्सा होणे गरजेचे आहे. आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार स्व. यशवंतरावजी चव्हाण प्रतिभावंत लेखक म्हणून मराठी वाचकांना परिचयाचे आहेत. त्यांचे सामाजिक, शैक्षणिक, राजकीय विचार व्यक्त करणारी हजारो पत्रे आज उपलब्ध आहेत. त्याचे विश्लेषण आणि चिकित्सा केली तर यशवंतरावांचे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व वाङमयविषयक विचार समजू शकतील. याच पत्र वाङमयाच्या परंपरेत साहित्य क्षेत्रातील मान्यवरांनी जाणीवपूर्वक दखल घ्यावी अशा प्रकारची पत्रे ॲड. रावसाहेब शिंदे यांची आहेत. नुकतेच त्यांच्या पत्र वाङमयाचे पाच खंड 'संवादपर्व' या शीर्षकाखाली प्रकाशित झाले आहेत. वास्तविक पाहता या संवादपर्व मधील पत्रवाङमयाचे विषय पाहिले तर संवादपर्वच्या पाचही खंडाची समग्र चिकित्सा होणे गरजेचे आहे. यामधून ॲड. रावसाहेब शिंदे यांच्या वेगळ्या व्यक्तिमत्त्वाची आणि त्यांच्या वैचारिकतेची नवीन ओळख महाराष्ट्राला होईल असे वाटते.

## संवादपर्व : आशय व अभिव्यक्ती वेगळेपण

मराठी पत्रवाङमयामध्ये आशय व अभिव्यक्तीच्या दृष्टीने एक वेगळे मानदंड निर्माण करणारे पाच खंड म्हणून संवादपर्वचा उल्लेख करावा लागेल. ॲड. रावसाहेब शिंदे हे एक बहुश्रुत व्यक्तिमत्त्व समाजात काही माणसे अशी असतात की, जी स्वतःच्या उध्दारात जीवनाचे सार्थक मानतात, तर काही लोक असे असतात की, दुसऱ्याच्या डोळ्यातील करूणा जाणून त्यांच्या उध्दारामध्येच आपल्या जीवनाचे चैतन्य शोधतात. ॲड. रावसाहेबांचे व्यक्तिमत्व हे दुसऱ्या प्रकारचे आहे. त्यामुळे अगदी बालपणापासूनच त्यांचा मित्रपरिवार वाढत गेला. समाजातील सामाजिक विकासाच्या चळवळी आणि रावसाहेब हे जणू एक समीकरणच झाले आहे. त्यामुळे सामाजिक राजकीय, शैक्षणिक क्षेत्रांबरोबरच ग्रामीण भागातील सामान्य माणसांशी त्यांचे स्नेहानुबंध वाढत गेले. त्यांच्याशी पत्रांच्या माध्यमातून संवाद साधण्यात रावसाहेबांना विशेष आनंद वाटत असतो. त्यामुळे गेल्या सात दशकातील त्यांचा पत्र संवाद संकलित करून तो समाजापुढे मांडण्याचे त्यावर संस्कार करण्याचे अवघड शिवधनुष्य संपादक मंडळाने पेलले आहे. त्यांनीच नमूद केल्याप्रमाणे ॲड. रावसाहेब शिंदे यांच्या एकूण ५००० पेक्षा अधिक असलेल्या पत्रातून सुमारे

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320-8341

२५०० पत्रांची निवड करून ती पाच खंडात महाराष्ट्रातील वाचकांसमोर ठेवली आहेत. यामध्ये समाजाच्या विकासासाठी अखंड प्रयत्न करणाऱ्या यशवंतरावजी चव्हाण, मा. शरदरावजी पवार, कुष्ठरोग्यांसाठी जीवन वेचणारे बाबा आमटे, प्रकाश आमटे यासारख्या असंख्य व्यक्तींना पाठविलेल्या पत्रांचा जसा समावेश आहे, तसाच वरील व्यक्तींची रावसाहेबांच्या कर्तृत्वाला दाद देणारी पत्रे वाचणे म्हणजे चोखंदळ मराठी वाचकाला एक पर्वणीच आहे. गांधीवादी विचार हेच आपली जीवनसक्ती मानणाऱ्या रावसाहेबांच्या पत्रांचे व त्यांना आलेल्या पत्रांचे आशय आणि अभिव्यक्तींच्या दृष्टीने विभाजन केले तर प्रत्येक विषय एका स्वतंत्र चर्चासत्राचा होऊ शकेल. मा. जयंत पाटलांनी व्यक्त केलेला विचार 'आपले कार्य समाजाला दीपस्तंभासारखे आहे किंवा उध्वस्त खेड्यांना केवळ तुम्हीच सावरू शकता'. एवढा अढळ विश्वास शरद पवारांनी आपल्या पत्रातून व्यक्त केला. यामध्येच ॲड. रावसाहेबांची सामाजिक जीवनाशी नाळ किती अतूट आहे याचा अनुभव मिळतो. वास्तविक पाहता संवादपर्वच्या पाच खंडावर भाष्य करावयाचे म्हटले तर एका किंवा दोन निबंधात ते शक्य नाही याची मला जाणीव आहे. म्हणूनच शोधनिबंधाच्या मांडणीला मर्यादा आखून ध्यासपर्वच्या संदर्भातील पत्रात्मक आविष्काराचा विचार केला आहे.

## ध्यासपर्व आणि संवादपर्व एक अनुबंध

सामाजिक बांधिलकी आणि मानवतावाद मानणारे ॲड. रावसाहेब शिंदे यांच्या वैचारिकतेवर जीवनकार्यावर महात्मा गांधी, कर्मवीर भाऊराव पाटील, बाबा आमटे यांच्या विचारांचा मोठा प्रभाव दिसतो. समाजात समता, बंधुता प्रस्थापित व्हावी म्हणून रात्रंदिवस ध्येयवादाने झपाटून जाऊन काम करणारे, समतेचा, मानवतावादाचा, सामाजिक बांधिलकीचा ध्यास घेणारे, जेथे वक्तृत्व सुरू होते, तेथे कर्तृत्व संपते असे म्हणणारे ॲड. रावसाहेब शिंदे हे प्रतिभावंत साहित्यिक आहेत याची प्रचिती त्यांचे भावलेली माणसे, 'प्रश्न आहे मूल्यांचा' आणि विशेषतः त्यांचे 'ध्यासपर्व' हे आत्मचरित्र वाचल्यानंतर येतो.

'ध्यासपर्व' हे ॲड.रावसाहेब शिंदे यांचे आत्मचरित्र नाही तर तो स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर कालखंडातील महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, साहित्यिक चळवळीचा दस्तावेज आहे. या संदर्भात डॉ. चित्तरंजन साठी म्हणतात, "रावसाहेबांचे आत्मचरित्र हा त्यांच्या स्वतःच्या कौटुंबिक, वैचारिक व सामाजिक जीवनाचा आलेख आहे, पण तो केवळ व्यक्तिगत नाही. तर त्याला त्या काळातील राजकीय, सामाजिक इतिहासाचा संदर्भ आहे." (शिंदे रावसाहेब २००९ : ९) ध्यासपर्व या आत्मचरित्राचा लोकार्पण सोहळा संपन्न झाला. एक उच्च वाङमयीन दर्जा असलेले आत्मचरित्र म्हणून समाजाच्या सर्व स्तरातील लोकांनी आपल्या भावना पत्राद्वारे लेखकाला कळविल्या. यामध्ये प्रकाशक, लेखक, राजकारणी, सामाजिक कार्यकर्ते, शिक्षक, प्राध्यापक, अगदी एक आठवीतील १२ वर्षाचा मुलगा यांनी दिलेल्या पत्रात्मक प्रतिक्रिया लेखकाला नवीन लेखनाची उर्मी देणाऱ्या, कृतार्थतेची जाणीव करून देणाऱ्या आहेत.

ध्यासपर्वच्या श्रेष्ठ दर्जाची साक्ष देणारी ९७ पत्रे लेखनाला आलेली आहेत. ही सर्वच पत्रे मुळातून वाचण्यासारखी आहेत. ध्यासपर्वचा वाङमयीन दर्जा तर श्रेष्ठ आहेच. मात्र त्यांच्या पत्रात्मक प्रतिक्रिया तेवढ्याच वाङमयीन असल्याची जाणीव निर्माण होते. अनेक पत्रलेखकांनी पत्रामध्ये वापरलेली भाषा, उपमा, अलंकार, निवेदनाचा ओघवतेपणा पाहिला तर 'पत्राविष्कार ध्यासपर्वचा' या शीर्षकाखाली एक सुंदर कलाकृती निर्माण होऊ शकेल असे वाटते. विशेषतः ज्यांच्या वाङमयीन जाणीवा अत्यंत प्रगल्भ आहेत अशा प्रतिभावंत लेखकांनी ध्यासपर्व संदर्भात व्यक्त केलेला पत्रात्मक अविष्कार वाचताना मनात भावनात्मकता निर्माण होते. भावनात्मकता, सौंदर्य,

रचनेचे तंत्र ही ललित वाङमयाची महत्त्वाची मूल्ये मानली जातात. ही सर्वच मूल्ये पत्राविष्कारातून जाणवतात. विशेषतः मुकुंदराव किर्लोस्कर, ग.प्र.प्रधान, डॉ.आनंद यादव, म.द. हातकणंगलेकर यांच्यासारख्या लेखकांच्या प्रतिक्रिया मुळातून वाचल्या म्हणजे पत्रात्मक वाङमय एक स्वतंत्र अभ्यासाचा विषय होऊ शकतो याची जाणीव प्रकर्षाने निर्माण होते.

ध्यासपर्व संदर्भात आपल्या पत्रातून अभिप्राय व्यक्त करताना म.द. हातकणंगलेकर म्हणतात, "आत्मचरित्राला ध्यासपर्व हे दिलेले नाव प्रथम वाचताना अतिशयोक्ती वाटते, पण जसे ते वाचू लागतो तसे या माणसाच्या समाजसेवेचा, राजकीय कार्याचा, व्यावसायिक कर्तबगारी सिध्द करण्याचा ध्यास किती जाज्वल्य होतो हे पाहिले की नाव अतिशयोक्त नाही याची खाली पटते"(म्हस्के ज्ञानदेव (संपा), २०११ : ३५०) तर ध्यासपर्वचे रचना विशेष अनेक पत्रलेखकांनी नोंदविलेले आहेत. विशेषतः प्राचार्य चंद्रशेखर खांडगे, डॉ. आनंद यादव, ग.प्र. प्रधान यांच्यासारखा लेखक विचारवंतांनी दिलेल्या प्रतिक्रिया अत्यंत प्रांजळ आहेत. प्राचार्य खांडगे यांनी 'साठा उत्तराची सफल कहाणी' या शीर्षकाखाली दिलेले पत्र म्हणजे पत्रात्मक वाङमयाचा उत्तम नमुना म्हणावा लागेल, या सर्वच पत्रलेखकांनी ध्यासपर्व संदर्भात आपल्या भावना मांडतानाच अॅड. रावसाहेब शिंदे यांच्या जीवनाचा प्रवास, त्यांचे बालपण, शिक्षणासाठी केलेली धडपड, लहान वयातच सामाजिक कार्याची आवड त्यातून केलेली वसतिगृहाची निर्मिती कम्युनिष्ट पक्षाच्या विचारांचा पगडा, स्वातंत्र्य चळवळीतील सहभाग, वकिली व्यवसायातील योगदान, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांचा प्रभाव, रयत शिक्षण संस्थेतील योगदान, बाबा आमटेंच्या आनंदाश्रमातील कार्य, कुटुंब वत्सलता, सहृदी माणूस, प्रतिभावंत लेखक अशा कितीतरी पैलूचा उलगडा आपल्या पत्रातून केला आहे. त्याबरोबरच या ध्यासपर्वमधील त्रुटीही तेवढ्याच प्रांजळपणे व्यक्त केल्या आहेत. 'साहित्यिक आणि कला' क्षेत्रातील मित्रांच्या आठवणी रंगवताना खूपच त्रोटकपणा आला आहे. (म्हस्के ज्ञानदेव, २०११ : १७१) ही उणीवही या पत्रामधून दिसते. ग.प्र. प्रधान यांच्याबरोबर अॅड. रावसाहेब शिंदे यांचे मित्रत्त्वाचे संबंध सर्वश्रुत आहेत. ते म्हणतात, "या आत्मकथनात गेल्या साठ-पासष्ठ वर्षामध्ये महाराष्ट्रात झालेली राजकीय आंदोलने, सामाजिक चळवळी व शैक्षणिक प्रगती यांचे वर्णन करताना ते ग्रामीण भागातील जीवनात रमले". (म्हस्के ज्ञानदेव, २०११ : २७७) एका अर्थाने ध्यासपर्व हे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, सामाजिक व राजकीय चळवळींचा दस्तच आहे, असे ग.प्र. प्रधान यांना वाटते. भाई वैद्य यांचे ध्यासपर्व वरील दीर्घ पत्रात्मक चिंतन संवादपर्व ग्रंथाची वाङमयीन उंची वाढविणारे आहे. ध्यासपर्व एकदा वाचून समाधान झाले नाही म्हणून दुसऱ्यांदा वाचले अशी प्रांजळ भावना व्यक्त करणारे शरदचंद्रजी वाळिंबे (पुणे) यांनी ध्यासपर्व म्हणजे महाराष्ट्राच्या उभारणीतील महत्त्वाचे पान वाटते. तर ध्यासपर्व या आत्मचरित्राची जातकुळी दुर्गा भागवतांच्या 'व्यासपर्व', 'टॉलस्टॉयच्या वॉर अॅण्ड पीस' या कादंबऱ्यांबरोबर करणारे राजाभाऊ गवांदे आत्मचरित्र लेखनाच्या निकषाला तंतोतंत बसलेले आत्मचरित्र असा उल्लेख करतात. ते म्हणतात "अंतर्मुख पातळीवरील चिंतनशीलता आणि प्रांजळ आत्मकथन हे आत्मचरित्र लेखनाचे निकष मानले जातात. मात्र एकूणच मराठी आत्मचरित्र लेखनात हे गुण कमी प्रमाणात आढळतात.थोडीशीच आत्मचरित्रे अशी आहेत की, ज्यात प्रौढ जीवन चिंतन व प्रांजळ आत्मकथन यांचा प्रत्यय येतो. ध्यासपर्वचा उल्लेख यामध्ये करावा लागेल." (म्हस्के ज्ञानदेव, २०११ : २३४)एवढी बोलकी प्रतिक्रिया ध्यासपर्वचा वाङमयीन दर्जा ठरविण्यास पुरेशी आहे असे वाटते. तर लेखन अत्यंत प्रांजळपणे, मुक्तपणे आणि संवेदनशीलतेने केले आहे. यातून एक वास्तव जीवन नाट्य रसरसून आले आहे. ही डॉ. आनंद यादव यांची पत्ररूप प्रतिक्रिया लेखकाला आत्मबल देऊन जाणारी आहे.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320-8341

वास्तविक 'संवादपर्व' मधील 'ध्यासपर्व' संदर्भातील तसेच इतर पत्रात्मक प्रतिक्रिया उत्तम पत्र वाङमयाचा नमुना म्हणून तपासता येण्यासारख्या आहेत. संपादन समितीने निवेदन केल्याप्रमाणे ध्यासपर्व आत्मचरित्रातील सर्व ९७ पत्रे संवादपर्वमध्ये घेतली असती तर वाचकांना त्यामधील विचारांची पर्वणी मिळाली असती. भविष्यात संवाद पर्वचे पुढील खंड वाचकांसाठी उपलब्ध होतील त्यामध्ये उर्वरित पत्रांचा समावेश होईल अशी अपेक्षा आहे. एकूणच संवादपर्व मधील पत्रविचारातून 'हे विश्वचि माझे घर' या संत ज्ञानेश्वरांच्या उक्तीप्रमाणे महाराष्ट्रात, महाराष्ट्राच्या बाहेर तसेच परदेशातही आपला मित्र परिवार निर्माण करणाऱ्या ॲड. रावसाहेब शिंदे यांच्या मित्र प्रेमाची साक्ष पटते. आजच्या गतीमान युगात संवादाची अनेक साधने उपलब्ध असतानाही कोरड्या संवादात न अडकता पत्रमैत्रीमध्ये जीवनानंद शोधणारे, पत्रसंवादातून भावनेचा ओलावा जोपासणाऱ्या एका सऱ्हयी निर्मळ मनाच्या, आभाळाएवढ्या माणसाचे दर्शन संवादपर्वमधून घडते.

## भाषा विशेष

साहित्याच्या क्षेत्रात पत्रात्मक वाङमय ललित वाङमयाचा भाग होऊ शकतो का ? अशा प्रकारची निरर्थक चर्चा नेहमीच घडत असते. मात्र मराठी वाङमयाच्या इतिहासातील पत्रात्मक वाङमयाचा चिकित्सकपणे आढावा घेतला तर लक्षात येईल. ललित वाङमयाची अनेक वैशिष्ट्ये पत्रात्मकवाङमयामध्ये अंतर्भूत झालेली आहेत. त्यादृष्टिने संवादपर्वच्या पाचही खंडांची चिकित्सा केल्यास लक्षात येईल की पत्रात्मक अविष्कार हा पत्रलेखकाचा आत्माविष्कारच असतो. त्यामध्ये लालित्य, सौंदर्य, सामाजिक वास्तव, रचनातंत्र, प्रतिमा यासारखी वैशिष्ट्ये दिसून येतात. ध्यासपर्व संदर्भातील आपली भावना पत्रातून व्यक्त करताना मुकुंदराव किर्लोस्कर आपल्या पत्रात म्हणतात, "काहीजण कागदावर घराचे आदर्श चित्र काढतो, तर दुसरा दगड, वीट, सिमेंटच्या मदतीने ते घर प्रत्यक्ष उभे करतो, कागदाच्या घराला दगड वीटामुळे कायमचे अस्तित्त्व प्राप्त होते. ध्यासपर्व मधील असंख्य घटना, प्रसंगांच्या वर्णनांनी नेमकी हीच कामगिरी केली आहे." (म्हस्के ज्ञानदेव, २०११ : २३८) अनुभवाची एवढी समृध्दी असलेला दुसरा कोणता श्रीमंत माणूस मी महाराष्ट्रात पाहिला नाही, 'सहवास अल्पकालीन ठरला, पण तो हिरव्या चाफ्याच्या फुलासारखा म्हणूनच त्याचा गंध दीर्घकालीन' अशा अनेक उपमा, दृष्टान्त अलंकारांनी संवादपर्वाचे वाङमयीन सौंदर्य वाढविले आहे. यासारख्या संदर्भपर्वमधील पत्रात्मक प्रतिक्रिया पाहिल्या तर मराठीतील पत्रात्मकवाङमय हा ललित साहित्याचा एक अविभाज्य घटक तर आहेच, तथापि तो एक स्वतंत्र अभ्यासाचा, संशोधनाचा विषय होऊ शकतो याची प्रचिती येते. संवादपर्व या पत्रात्मक ग्रंथांचे पाच खंड म्हणजे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, शैक्षणिक, सामाजिक, राजकीय चळवळींचा विचार मांडणारे अक्षरग्रंथ आहेत. त्याची सर्वांगाने चिकित्सा झाली तर भविष्यात महाराष्ट्राच्या प्रगतीशील स्थित्यंतराचा अभ्यास करणाऱ्या संशोधकाला तो मार्गदर्शक ठरेल.

## निष्कर्ष

मराठीतील पत्रवाङमयाला खूप मोठी प्राचीन परंपरा आहे. संवादपर्वमध्ये एका अर्थाने स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील महाराष्ट्राच्या विविध चळवळींचा इतिहास संकलित केला आहेच. परंतु त्याचबरोबर लेखकाच्या जीवनविषक मूल्यांच्या जाणीवा ठळकपणाने आधेरेखित झाल्या आहेत. ध्यासपर्व संदर्भातील विविध मान्यवरांचा पत्रात्मक अविष्कार लेखकांच्या उच्च प्रतिभेची साक्ष देणारे आहेत. त्याचबरोबर एका मित्रत्वाच्या भावनेने त्यातील त्रुटीची जाणीवही करून देणाऱ्या आहे. मात्र या त्रुटी म्हणजे ध्यासपर्वचा उणेपणा नसून विस्तारसंकोचातून हे घडले असावे. अशी नोंदविलेली प्रतिक्रिया ॲड. रावसाहेब शिंदे यांच्यावरील नितांत प्रेमाची साक्षच देते.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320-8341

संवादपर्वच्या सर्वच खंडामधून ॲड. रावसाहेब शिंदे यांच्या उत्तुंग व्यक्तिमत्वाची साक्ष महाराष्ट्राला पटते. एक द्रष्टे विचारवंत तळमळीचे सामाजिक कार्यकर्ते, सऱ्हदी, कनवाळू वकील, शिक्षणावर आणि कर्मवीरांच्या विचारांवर अढळ श्रध्दा ठेवून शिक्षण क्षेत्रात व रयत शिक्षण संस्थेमध्ये आधुनिक शिक्षणाचे प्रयोग करणारा दृष्टे शिक्षणतज्ज्ञ, प्रसिध्दीपासून दूर असलेला मोठा माणूस, सऱ्हदी मित्र, कुटुंबवत्सल या आणि यासारख्या व्यक्तिमत्त्वाच्या अनेक विशेषांचा प्रत्यय या संवादपर्वमधून येतो.

## संदर्भ ग्रंथसूची

१.जोशी लक्ष्मण शास्त्री, संपा - मराठी विश्वकोश खंड - ९
२. हातकणंगलेकर म.द. (संपा)जी.ए.ची निवडक पत्रे, मौज प्रकाशन आवृत्ती पहिली
३. शिंदे रावसाहेब (डॉ) ध्यासपर्व, आवृत्ती चौथी २००९, प्रस्तावना
४. म्हस्के ज्ञानदेव, संपा - संवादपर्व, अमेय प्रकाशन, प्रथम आवृत्ती